**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ चा जबाब</u>**

साक्षीदाराचे नावः– **रेखा लक्ष्मण भंडे**

वयः– **३६** वर्षे, व्यवसायः– **घरकाम**,

राहणारः– **शिरशी हंगरगा ता. निलंगा जि. लातूर.**

**<u>सरतपास फिर्यादीतर्फे विधीज्ञ व्ही. एन. मेहेत्रे चे मार्फत शपथेवर सुरुः–</u>**

**०१.** घटना दिनांक १७/१०/२०१८ रोजी सकाळी ०८.०० वाजता आमच्या शेतामध्ये घटना घडली होती. मी आणि माझी सासू चगळ वेचत होतो तेंव्हा आरोपी क्र.१ बैल घेवून शेतात आले. माझी सासू त्यांना शेतातून वाट करु नका, बंधारावरुन वाट करा असे म्हणाले. आरोपी क्र.१ ने, “तु कोण छिनाल रांड, आम्हाला भर मधातून वाट करायची आहे” असे माझ्या सासूला म्हणाला. त्यानंतर आरोपी क्र.१ ते ४ यांनी मला आणि माझ्या सासुला लाथा–बुक्यांनी मारहाण केली. त्यानंतर आरोपी क्र.२ ही मला उद्देशून तु जर आमच्या वाटेत आलीस तर आडव पाडून माझ्या नवऱ्याला झवायला लावेन असे म्हणाले. शिवम्माबाई शेषराव भंडे, शेषराव भंडे यांनी ते भांडण सोडवले. पुन्हा जर वाटेत आला तर जिवे मारु अशी आरोपीने आम्हाला धमकी दिली. आरोपी क्र.१ ते ४ यांना मी आळखते. आरोपींपैकी आरोपी क्र.३ न्यायालयात हजर नाही. उर्वरीत आरोपी क्र.१, २ व ४ हजर आहेत. मी त्यांना ओळखते.

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ के. एन. पवार मार्फत शपथेवर सुरुः–</u>**

**०२.** मला आमच्या शेताचा सर्वे नंबर सांगता येत नाही. आमच्या शेताच्या पुर्वेला शेषराव भंडे, पश्चिमेला भिम सरवडे, दक्षिणेला रस्ता व उत्तरेला राजू सुर्यवंशी यांचे शेत आहे. त्या शेतामध्ये घटनेच्या पुर्वी दोन ते

चार दिवस हरभरा पेरला होता. तो उगवला नव्हता. आमच्या शेतामध्ये विहीर नाही. हरभऱ्याला पाणी दिले नव्हते. माझी सासू आणि आरोपी क्र.१ च्या आई यांच्यामध्ये यापुर्वीचा वाद होता. तो वाद कसला होता तो मला माहित नाही. माझे लग्न २००५ मध्ये झाले आहे. शिवम्माबाई आणि शेषराव हे माझे चुलत सासू आणि सासरे आहेत. शेषराव आणि शिवम्माबाई घटनेच्यावेळी त्यांच्या शेतात काम करत होते. शेषराव आणि शिवम्माबाई घटनेच्या वेळी घटना ठिकाणा पासून १०० मीटर अंतरावर होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सासूचे आरोपी क्र.१ सोबत भांडण असल्यामूळे तिने माझ्या मदतीने खोटी केस दाखल केली आहे. भांडण चालू झाल्यानंतर १० मिनीटांनी शेषराव आणि शिवम्माबाई आमच्याकडे आले. शेषराव आणि शिवम्माबाई स्वतःहून आल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने, “तु कोण छिनाल रांड, आम्हाला भर मधातून वाट करायची आहे” असे माझ्या सासूला म्हणाला असे मी खोटे सांगत आहे. घटनास्थळ पंचनाम्यास मी गेले होते. पंचनाम्यावेळी सुरेश कोळेकर, दयानंद शेषराव श्रीभवाने हे हजर होते. मी माझ्या सासू बरोबर पो.स्टे ला गेले होते. पोलिसांनी माझ्या सासूला हलगरा येथील सरकारी दवाखाण्यात पाठवले होते. मी दवाखाण्यात उपचार घेतले नव्हते. माझी सासू एक दिवस अॅडमीट होती. आरोपी दोन बैल घेवून आमच्या शेतातून जात होते. सकाळी १०.३० वाजता माझ्या सासूला दवाखाण्यात नेले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे.

**<u>उलटतपास पूर्ण</u>.**

 नियमित फौजदारी केस **क्र. ६२०/२०१८**

**नि.क्र. ४६**

**<u>फेरतपास नाही.</u>**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.**

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2025.07.23 10:53:02 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांकः–२२/०७/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, निलंगा.

ठिकाणः–निलंगा जिल्हा लातूर.